Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

# MPSC
# SWO

## Previous Year Paper
### 09 Jun, 2013

Teachingninja.in

विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी व तत्सम पद
सामान्य राज्य सेवा - गट - 'अ'

# A

**2013**

दि. ८ जून, २०१३

**CODE : ZO1**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET NO.**

**प्रश्नपुस्तिका**

**चाळणी परीक्षा / SCREENING TEST**

**वेळ : 1½ (दीड) तास** | **एकूण प्रश्न : 150** | **एकूण गुण : 150**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेतील सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

SEAL

Teachingninja.in

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

Teachingninja.in

1. भारतीय राज्यघटनेचा अनुच्छेद क्रमांक __________ हा समान किंवा सन्मानपूर्वक व्यवहार या संबंधीचे स्पष्टीकरण देतो.

(1) 16 (2) 15 (3) 17 (4) 18

---

2. रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा.

जेंव्हा व्यक्ती सामाजिक संस्थांच्या नियंत्रणाचा विरोध करते आणि लोकनीती, चालीरिती, परंपरा यांची अवहेलना करते तेंव्हा __________ विसंघटन घडून येते.

(1) सामाजिक (2) सामुदायिक (3) वैयक्तिक (4) कौटुंबिक

---

3. सद्यकालीन समाज कार्यावर प्रभाव टाकणारी विचारधारा कोणती ?

(अ) बहु संस्कृतीवाद

(ब) चिरंतन विकास

(क) पॉलो फ्रेरे यांची लोककेंद्रित कृतीगटवादी विचारधारा

(ड) मार्क्सवादी पर्यायी विकास विचारधारा

(1) (अ) फक्त (2) (ब) फक्त

(3) (क) व (ड) फक्त (4) (अ), (ब), (क) व (ड)

---

4. रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा.

आईवडिलांकडून संक्रमित होणारे वंशाणु पुढच्या पिढीतील बालकाची शारीरिक व मानसिक __________ निश्चित करतात.

(1) स्थिती (2) विकास (3) गुणधर्म (4) प्रगती

---

5. जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | सतनामी चळवळ | (I) | केरळ |
| (ब) | नाडर चळवळ | (II) | मध्यप्रदेश |
| (क) | इझावास चळवळ | (III) | पंजाब |
| (ड) | आदिधर्म चळवळ | (IV) | तामीळनाडू |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (II) | (IV) | (I) | (III) |
| (2) | (I) | (II) | (III) | (IV) |
| (3) | (I) | (III) | (II) | (IV) |
| (4) | (IV) | (III) | (II) | (I) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

6. बाललैंगिक शोषणाविरुद्धचा 'द प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन अगेन्स्ट सेक्शुअल ऑफेन्सेस', हा कायदा संसदेत केव्हा संमत झाला ?

(1) 2007 (2) 2005 (3) 2006 (4) 2012

---

7. बांग्लादेशातील कोणत्या अर्थतज्ञानी 1970 साली 'माइक्रो क्रेडीट' आंदोलनाची सुरूवात केली ?

(1) शेख मोहम्मद (2) मुजीबुर रहमान (3) युनुस खान (4) मोहंमद युनुस

---

8. रिकामी जागा सुयोग्य शब्दाने भरा.

राष्ट्राचा कारभार __________ तसेच भ्रष्टाचारविरहीत चालवायचा असल्यानेच संसदेने जनतेसाठी 'माहितीचा अधिकार अधिनियम 2005' हा कायदा संमत केला आहे.

(1) चांगला (2) पारदर्शकपणे (3) प्रगतीशील (4) विकासाभिमुख

---

9. राज्य समाजकल्याण सल्लागार मंडळाच्या सदस्यांची नियुक्ती कोण करते ?

(1) संबंधित राज्य

(2) केंद्र सरकार

(3) राज्य सरकार आणि केंद्रीय समाजकल्याण मंडळ (50% - 50%)

(4) केंद्रीय समाजकल्याण मंडळ

---

10. वातपित्त व कफ या धातुतत्वावर व भारतीय तत्वज्ञानावर आधारित व्यक्तिमत्वाचे किती प्रकारात वर्गीकरण करता येते ?

(1) 6 (2) 9 (3) 3 (4) 4

---

11. भारतात कोणत्या सामाजिक सहाय्यता योजना राबविल्या जातात ?

(अ) राष्ट्रीय वृद्धापकालीन निवृत्ती वेतन योजना

(ब) कामगार राज्य विमा योजना

(क) राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना

(ड) राष्ट्रीय मातृत्व लाभ योजना

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) फक्त (अ) आणि (ब) (4) फक्त (अ), (क) आणि (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**12.** खालीलपैकी कोणते विधान व्यावसायिक समाजकार्याचे वर्णन करते?

(1) दान-धर्म करणे

(2) श्रमदान/विनावेतन सेवा देणे

(3) व्यक्ती, गट, समुदायाची सामाजिक व्यवहारासाठी क्षमता वाढविणे

(4) शासन आणि संस्थांद्वारा अपंग, निराधार लोकांना अर्थसहाय्य करणे

---

**13.** शैशवावस्थेच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान चूक आहे?

(1) शैशवावस्था हा विकासाचा पाया आहे.

(2) शैशवावस्था परावलंबन कमी करणारी असते.

(3) शैशवावस्थेत समाजीकरणाची सुरूवात होते.

(4) शैशवावस्था हे टोळीवय होय.

---

**14.** समाज परिवर्तनाच्या आधुनिक पाश्चात्य विचारधारा खालीलपैकी कशावर आधारित नाहीत?

(1) तर्कवाद (बुद्धीप्रामाण्यवाद) (2) उदारमतवाद

(3) उपयुक्ततावाद (4) भक्ती आणि सूफी गूढवाद

---

**15.** व्यक्तिमत्व विकासातील, आठ पेचप्रसंग युक्त मनोसामाजिक सिद्धांत खालीलपैकी कोणी मांडला?

(1) सिगमंड फ्रॉईड (2) एरिक एरिकसन (3) जीन पीजे (4) कोहलबर्ग

---

**16.** बाल गुन्हेगारांना सुधारण्यासाठी खालीलपैकी कोणती पद्धती वापरली जाते?

(अ) मानसोपचार

(ब) वर्तन उपचार

(क) कृती उपचार

(ड) शिक्षा

(1) फक्त (अ), (ब) (2) फक्त (ब)

(3) फक्त (अ), (ब), (क) (4) फक्त (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

17. व्यक्ती सहाय्य कार्य मानव व त्याच्या सभोवतालचे वातावरण यांच्यात काय साधते ?

(1) संबंध (2) सामंजस्य (3) दुवा (4) समतोल

18. संशोधन समस्येचे पूर्व ज्ञानामुळे सुचलेले एक संभाव्य उत्तर किंवा स्पष्टीकरण म्हणून मांडण्यात आलेले विधान कोणते होय ?

(1) भाकीत (2) संशोधन (3) निरीक्षण (4) गृहीतकृत्य

19. सी.एच्.कुले यांनी व्यक्ती व समाज यांच्या संबंधाबाबतीत कोणता सिद्धांत मांडला आहे ?

(1) सकारात्मक सिद्धांत (2) फेस टू फेस

(3) लुकिंग ग्लास सेल्फ थिअरी (4) सोशल फॅक्टर थिअरी

20. भारतीय राज्यघटनेचा कोणता अनुच्छेद शासनास सर्व भारतीय नागरिकांना मोफत व समान न्याय देण्याचे निर्देश देतो ?

(1) 38 अ (2) 39 अ (3) 17 (4) 18

21. भारतात अपराधिक–न्याय व्यवस्थेत जनतेच्या सहभागाची कोणत्या शतकाच्या शेवटी–शेवटी सुरुवात झाली ?

(1) 18 व्या शतकाच्या शेवटी (2) 19 व्या शतकाच्या शेवटी

(3) 20 व्या शतकाच्या शेवटी (4) 17 व्या शतकाच्या शेवटी

22. सती जाण्याच्या कृत्यास प्रतिबंध कायदा, 1987 नुसार आमरण तुरुंगवासाची शिक्षा खालीलपैकी कोणत्या अपराधासाठी होऊ शकते :

(1) सती जाण्याचा प्रयत्न करणे.

(2) सती जाण्यास प्रवृत्त करणे.

(3) सतीचा गौरव करणे.

(4) जिल्हाधिकारी किंवा जिल्हा न्यायदंडाधिकारी यांच्या मनाई हुकुमाचा भंग करणे.

23. केंद्रीय समाजकल्याण मंडळाच्या सर्वसाधारण मंडळाचे (General Body) किती सदस्य असतात ?

(1) 16 (2) 40 (3) 52 (4) 56

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**24.** महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची स्थापना महाराष्ट्र शासनाने कोणत्या अधिनियमा अंतर्गत, 10 जुलै 1978 रोजी केली ?

(1) सहकार अधिनियम
(2) कंपनी कायदा अधिनियम 1956
(3) धर्मदाय अधिनियम
(4) माहिती अधिकार अधिनियम

**25.** अस्पृश्यता निवारण, सांप्रदायिक एकता, दारूबंदी, नई तालीम इ. उद्देशाने प्रेरित चळवळ कोणती ?

(1) श्रीनिकेतन
(2) अंत्योदय
(3) सर्वोदय
(4) ख्रिश्चन मिशन

**26.** इंडियन असोशिएशन ऑफ ट्रेनड् सोशल वर्कर्स (IATSW) ची स्थापना कोणत्या साली करण्यात आली ?

(1) 1961
(2) 1963
(3) 1971
(4) यापैकी कोणतेही नाही

**27.** समाजव्यवस्था टिकविण्यासाठी तसेच समाजातील मानवसंस्थांची व मानवशक्तीची वाढ करण्यासाठी व टिकवण्यासाठी कोण/काय कार्य करते ?

(1) समाजकार्य
(2) सामाजिक चळवळ
(3) समाजसुधारक
(4) सामाजिक कायदे

**28.** लोककार्यक्रम व ग्रामीण प्रोद्योगिकी परिषद (कपार्ट) या संस्थेची स्थापना कोणत्या वर्षी करण्यात आली ?

(1) 1986
(2) 1985
(3) 1975
(4) 1981

**29.** वेठबिगारी (उच्चाटन) कायदा, 1976 चे उद्देश काय होते ?

(अ) वेठबिगारी मजुरांना ओळखणे.
(ब) वेठबिगारांची सुटका करणे.
(क) जबरी संमतीपत्र लादणाऱ्या गुन्हेगारांना शिक्षा करणे.
(ड) दक्षता समित्यांच्या नियमित बैठका घेणे.

(1) फक्त (अ), (ब)
(2) फक्त (ब), (क)
(3) फक्त (अ), (ब), (क)
(4) वरील सर्व (अ), (ब), (क), (ड)

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**30.** व्यक्ती विकासाचा मनोविश्लेषण सिद्धांत खालीलपैकी कोणी मांडला ?

(1) क्रेइमर (2) शेल्डन (3) सिगमंड फ्रॉईड (4) वरीलपैकी कोणीही नाही

---

**31.** रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा.

व्यक्ती मोठेपणी किती यशस्वीपणे _________ करेल ते लहान वयात प्रस्थापित होणारे वर्तनप्रकार, सवयी व अभिवृत्ती इत्यादीवरून ठरविले जाते.

(1) कार्य (2) समायोजन (3) नियोजन (4) प्रगती

---

**32.** रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा.

कल्याणकारी अर्थशास्त्रातील विवेचनाच्या मुळाशी _________ निर्णय असतात.

(1) स्वयं (2) सामाजिक (3) आर्थिक (4) नैतिक

---

**33.** ब्रॉन फ्रेन ब्रेनर यांच्या मते, व्यक्तिमत्व विकासावर परिणाम करणाऱ्या पर्यावरणाच्या स्तरामध्ये, खालीलपैकी कशाचा अंतर्भाव नाही ?

(1) सूक्ष्मयंत्रणा (2) मध्यमयंत्रणा (3) बाह्ययंत्रणा (4) आनुवंशिक यंत्रणा

---

**34.** बहुसंस्कृतीवादाचे लक्षण कोणते ?

(अ) विविधतेला मान्यता

(ब) स्वातंत्र्य, समता व न्यायाचा हक्क

(क) व्यक्तिवादाचा स्वीकार

(ड) ज्यांचे अस्तित्व टिकते ते लायक

(1) वरीलपैकी फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) फक्त (अ), (ब), (क) (4) फक्त (ड)

---

**35.** रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा.

ज्या व्यक्ती _________ दु:खी असतात त्या मोठेपणी दु:खी होण्याची शक्यता अधिक असते.

(1) बाल्यावस्थेत (2) किशोरावस्थेत (3) तारुण्यावस्थेत (4) पौगंडावस्थेत

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**36.** मानव विकास निर्देशांकाची संकल्पना कोणी मांडली ?

(1) डॉ. मेहबूब उल हक आणि डॉ.अमर्त्य सेन

(2) पी.चिदंबरम आणि यशवंत सिन्हा

(3) डॉ.मनमोहन सिंग व नरसिंहराव

(4) वरीलपैकी कोणीही नाही

---

**37.** नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955 नुसार खालीलपैकी कोणत्या कृत्यासाठी वैध कारवाई करता येत नाही ?

(1) धार्मिक **निःसमर्थता** लादणे.

(2) लोकसेवकाने अपराधास अपप्रेरणा दिल्याच्या अभिकथनास शासनाची पूर्वसंमती न घेता आरोप करणे.

(3) सामाजिक **निःसमर्थता** लादणे.

(4) धार्मिक, वैचारिक अशा कोणत्याही कारणाने अस्पृशता पालनाचे समर्थन करणे.

---

**38.** भारताचे संविधान कोणत्या विचारधारेचा पुरस्कार करते ?

(1) धर्मनिरपेक्षता

(2) निदेशक तत्वांच्या संबंधात मूलभूत हक्कांची सर्वोच्चता

(3) मूलभूत कर्तव्ये

(4) वरील सर्व

---

**39.** रिकामी जागा भरा.

सर्वांचे सर्व कल्याण म्हणजे __________ होय.

(1) समाजविकास (2) समाजकल्याण (3) सर्वोदय (4) समाजकार्य

---

**40.** बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा, 1986 नुसार खालीलपैकी कोणते वय वर्ष पूर्ण न केलेल्या व्यक्तीस बालक समजले जाते ?

(1) 21 वर्षे (2) 16 वर्षे (3) 15 वर्षे (4) 14 वर्षे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**41.** केंद्रीय समाजकल्याण मंडाळाची स्थापना कशासाठी करण्यात आली ?

(अ) राज्य व केंद्र सरकारच्या समाजकल्याणामध्ये दुवा साधणे.

(ब) अनुदानीत संस्थांच्या प्रकल्प व कार्यक्रमाचे मूल्यांकन करणे.

(क) सर्वेक्षणाच्या माध्यमातून समाजकल्याण संस्थांच्या आवश्यकतांची गरज शोधणे.

(ड) समाजकार्यातील प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (ड)
(2) (ब), (क) आणि (ड)
(3) (अ), (ब) आणि (क)
(4) (अ), (ब), (क) आणि (ड)

---

**42.** मॅक्स वेबर यांच्या आयडियल टाईप चे/चा प्रकार कोणते/कोणता –

(अ) ऐतिहासिक विशिष्ट बाबी

(ब) सामाजिक वास्तवाचे अमूर्त घटक

(क) विशिष्ट प्रकारच्या वर्तनाची विवेकपूर्ण पुनर्निर्मिती

(ड) वरील सर्व (अ), (ब), (क)

(1) फक्त (अ)
(2) फक्त (ब)
(3) फक्त (अ) आणि (क)
(4) (ड)

---

**43.** उत्तर बाल्यावस्था ही कोणत्या वैशिष्ट्यांनी ओळखली जाते ?

(अ) बेजबाबदारपणा-भांडणे

(ब) हे प्राथमिक शाळा वय असते

(क) हे टोळी वय असते

(ड) ही प्रौढत्वाची सीमारेषा असते

(1) फक्त (अ)
(2) फक्त (अ), (क)
(3) फक्त (अ), (ब), (क)
(4) फक्त (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

44. कल्याणकारी अर्थशास्त्राचे जनक कोणाला मानले जाते ?

(1) प्रो. ए.सी.पीगू (2) कौटिल्य (3) कार्ल मार्क्स (4) वि.म. दांडेकर

45. प्रशासनाचा वापर समुदायाच्या कल्याणाचे व ध्येयपूर्तीसाठी काय म्हणून केला जातो ?

(1) साधन (2) मदत (3) सहाय्यक (4) पूरक

46. दरवर्षी महाराष्ट्र राज्यशासन कोणत्या दिवशी राज्यातील तंटामुक्त गावांची यादी जाहीर करते ?

(1) 15 ऑगष्ट (2) 01 ऑगष्ट (3) 26 जानेवारी (4) 02 ऑक्टोबर

47. अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा, 1956 नुसार खालीलपैकी कोणत्या कृत्यासाठी स्त्री अपराधीस कारावासाऐवजी सुधारगृहात दाखल करता येईल ?

(1) कुंटणखाना चालविणे.

(2) वेश्या व्यवसायाच्या उत्पन्नावर उपजिविका करणे.

(3) अनैतिक व्यापाराच्या उद्देशाने व्यक्तीला डांबणे.

(4) वेश्यावृत्तीच्या प्रयोजनाने सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव करणे.

48. रिकामी जागा सुयोग्य शब्दाने भरा.

'स्व' हा जीवनाचा गाभा असून व्यक्ती नेहमी 'स्व' ला __________ ठेवण्याचा प्रयत्न करते.

(1) मनात (2) जागृत (3) विकसित (4) केंद्रस्थानी

49. रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा.

1950 च्या दशका दरम्यान __________ पाठिंब्याने कुटुंब नियोजन कार्यक्रम सुरु करणारा भारत पहिला देश होता.

(1) लोकांच्या (2) स्वयंसेवी संस्थांच्या (3) जागतिक बँकेच्या (4) शासनाच्या

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

50. जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | सामाजिक सुरक्षा विभागाची स्थापना | (i) | ऑक्टोबर, 1999 |
| (ब) | समाजकल्याण विभाग नामकरण | (ii) | मे, 1998 |
| (क) | सामाजिक न्याय व सबळीकरण मंत्रालय नामकरण | (iii) | जानेवारी, 1966 |
| (ड) | जनजाती कार्य मंत्रालय | (iv) | जून, 1964 |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (3) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (4) | (ii) | (i) | (iii) | (iv) |

---

51. कंठ ग्रंथीतील दोषामुळे कोणता प्रभाव दिसतो ?

(1) मतीमंदत्व व शरीराची वाढ खुंटणे
(2) स्त्रियांमध्ये पुरुषोचित वैशिष्ट्ये दिसणे
(3) व्यक्ती अस्वस्थ व अस्थिर बनते
(4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

52. सिगमंड फ्रॉईड यांनी मांडलेल्या व्यक्तिमत्व विकासाच्या अवस्था कोणत्या ?

(1) वेदन-कारक अवस्था-पूर्व संकल्पना काळ-भरीव कार्यान्वयन काळ
(2) पूर्व नैतिक स्तर-नैतिक विकास-मान्यता व मदत-सामाजिक दायित्व
(3) मुखावस्था-उत्सर्जन अवस्था-लैंगिक अवस्था सुप्तकाळ-पुनरूत्पादक काळ
(4) अनुकरण-सामाजिक अनुसरण-आज्ञाधारकता

---

53. खालीलपैकी समाज कार्याचे कोणते तत्व अचूक नाही ?

(1) सामाजिक वास्तवतेवर विश्वास
(2) अशिलाचा आदर करणे
(3) गोपनीयता सांभाळणे
(4) अशिलाबरोबर भावनिक गुंतवणूक

---

54. जात हा बंदिस्त वर्ग आहे असे कोणत्या विचारवंताने म्हटले आहे ?

(1) कार्ल मार्क्स
(2) स्वामी विवेकानंद
(3) डॉ.बाबासाहेब आंबेडकर
(4) डॉ. जी.एस्. घुर्ये

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

55. खालील कोणती विधाने बरोबर आहेत ?

(अ) 'स्त्री पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहिणाऱ्या ताराबाई शिंदे सत्यशोधक समाजाच्या खंद्या कार्यकर्त्या होत्या.

(ब) महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी 1893 साली विधवांसाठी महिलाश्रम सुरू केला

(क) गोपाळ गणेश आगरकर यांच्या बंडखोर विचारामुळे धर्ममार्तंडांनी त्यांच्या जीवंतपणीच प्रेतयात्रा काढली.

(1) फक्त (अ) बरोबर
(2) फक्त (अ) आणि (ब) बरोबर
(3) फक्त (क) बरोबर
(4) (अ), (ब), (क) सर्व बरोबर

---

56. व्यक्तीला __________ सामोरे जाण्यासाठी, तिच्या समस्या सोडविण्यासाठी केलेली मदत म्हणजे व्यक्तीसहाय्य कार्य होय.

(1) परिस्थितीला
(2) भविष्याला
(3) वास्तववादाला
(4) संकटाला

---

57. प्राथमिक गटामध्ये कशा प्रकारचे संबंध असतात व सदस्यांमध्ये कशा प्रकारची भावना असते ?

(1) अनौपचारिक संबंध असतात व परकेपणाची भावना असते.
(2) औपचारिक संबंध असतात व आपलेपणाची भावना असते.
(3) अनौपचारिक संबंध असतात व आपलेपणाची भावना असते.
(4) वरीलपैकी एकही नाही.

---

58. उद्‌बोधन भेटी, ग्रामीण शिबीर, अभ्यास सहल खालीलपैकी कशाचे घटक आहेत ?

(1) सामाजिक कृती
(2) क्षेत्रकार्य
(3) समाजकार्य संशोधन
(4) समाज कल्याण प्रशासन

---

59. बाल न्याय कायदा 1986 ने कोणती तरतूद केली आहे ?

(अ) बाल कल्याण मंडळ

(ब) बाल न्यायालय

(क) बाल मार्गदर्शन चिकित्सालय

(ड) विशेष गृह

(1) फक्त (अ)
(2) फक्त (अ) आणि (ब)
(3) फक्त (अ), (ब) आणि (ड)
(4) फक्त (अ), (ब) आणि (क)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

60. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करण्याबाबत अधिनियम, 2005 नुसार कौटुंबिक हिंसाचारामध्ये कशाचा अंतर्भाव होतो ?

(अ) पीडित व्यक्तीला किंवा तिच्या मानसिक व शारीरिक आरोग्याला हानी/इजा पोहोचवणे.

(ब) पीडित व्यक्ती किंवा तिच्या नातेवाईकाना हुंडा किंवा इतर मालमत्तेसाठी सतावणे, हानी/इजा पोहोचविणे.

(क) पीडित व्यक्तीला प्रिय अशा कोणत्याही व्यक्तीला शारीरिक वेदना देण्याची धमकी देणे.

(ड) सामाईक वापरातल्या घरामध्ये प्रवेश करण्यास निर्बंध आणणे

(1) फक्त (अ)

(2) फक्त (ब)

(3) फक्त (ड)

(4) वरील सर्व (अ), (ब), (क) आणि (ड)

---

61. रिकामी जागा सुयोग्य पर्यायाने भरा.

अर्भकावस्थेचे कार्य म्हणजे अर्भकाने __________ विषयी मूलभूत ज्ञान विकसित करणे होय.

(1) विश्वास (2) जन्म (3) पंचेंद्रिये (4) विकास

---

62. भारतात व्यावसायिक सामाजिक कार्यकर्त्यांसाठी नीती उद्घोषणा कोणी केली ?

(1) टाटा समाज विज्ञान संस्था शिक्षक मंच (TISSSWEF)

(2) भारतातील समाज कार्य शाळांची संघटना (ASSWI)

(3) विद्यापीठ अनुदान आयोग

(4) वरीलपैकी कोणीही नाही

---

63. व्यावसायिक समाजकार्याच्या व्यक्तिंनी संस्थागत परिस्थितीशी समायोजन साधणे आणि संस्थागत परिस्थितीच्या योग्य क्षेत्रात योग्य बदल करणे हा दृष्टिकोन खालीलपैकी कोणी मांडला ?

(1) मुरे रॉस (2) हॅमिल्टन (3) बिस्नो (4) मेरी रिचमंड

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

64. युनिसेफ (UNICEF) या बालकल्याण व महिला कल्याणाचे कार्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय निधीची स्थापना कधी झाली ?

(1) 1919
(2) 1945
(3) 1948
(4) वरील कोणत्याही वर्षी नाही

---

65. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?

(1) मॅक्स वेबर या समाजशास्त्रज्ञाने धर्माची मीमांसा करताना -
धर्म हा समाजजीवनास कसे वळण देतो आणि समाजजीवनातील अर्थ, काम इ.प्रेरणावरही धर्माचा प्रभाव कशा रितीने दिसून येतो याचे विवेचन केले आहे.

(2) मॅक्स वेबरचा धर्ममीमांसेचा दृष्टिकोन उत्क्रांतिवाद आहे.

(3) मॅक्स वेबरच्या मते जगात असा कोणताही समाज अस्तित्वात नाही की जेथे अलौकिक शक्ती, ईश्वर यासारख्या कल्पना आढळत नाहीत.

(4) मॅक्स वेबरने धर्मासंबंधी काहीही विवेचन केलेले नाही. त्याने केवळ नोकरशाही अधिकार आणि सत्ता याचेच विवेचन केले आहे.

---

66. रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा.

सुख हे आपल्या गरजपूर्तीतून किंवा __________ तून साध्य होते.

(1) धनपूर्ती (2) सेवापूर्ती (3) सुविधापूर्ती (4) इच्छापूर्ती

---

67. जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (अ) भारत सेवक समाज | (I) स्वामी विवेकानंद |
| (ब) सेवा सदन | (II) गोपाळकृष्ण गोखले |
| (क) रामकृष्ण मिशन | (III) डॉ. ॲनी बेझंट |
| (ड) महिलांचा आखिल भारतीय संघ | (IV) रमाबाई रानडे |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (I) | (II) | (III) | (IV) |
| (2) | (II) | (IV) | (I) | (III) |
| (3) | (IV) | (III) | (II) | (I) |
| (4) | (III) | (I) | (IV) | (II) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

68. रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा.

सामाजिक कल्याण प्रशासन म्हणजे प्रभावीपणे सेवा पुरविण्यासाठी आवश्यक __________ व __________ देणारी समाजकार्याची पद्धत आहे.

(1) तंत्र-तंत्रज्ञान (2) ज्ञान-कौशल्ये

(3) माहिती-अनुभव (4) माहिती-काम

---

69. अध्ययन, तर्कप्रक्रिया, विचार व भाषा ही मानवी विकासाचे कोणते अंग दर्शवितात ?

(1) भावनिक विकास (2) व्यक्तिमत्व आणि सामाजिक विकास

(3) बौद्धिक विकास (4) शारीरिक विकास

---

70. ऑटो रँक यांचा व्यक्तीमत्वाचा सिद्धांत कोणता ?

(1) विकास (2) जागृती (3) जाणीव (4) स्व

---

71. मानव समाजात परिवर्तन खालील घटकाद्वारे निश्चित केले जाते -

(अ) भौतिक (ब) मानसिक (क) आध्यात्मिक (ड) शारीरिक

(1) (अ), (ब) आणि (क) (2) (अ), (क) आणि (ड)

(3) (अ), (ब), (क) आणि (ड) (4) (ब), (क) आणि (ड)

---

72. भारतात लोकसंख्येचा विस्फोट होण्यास कोणते/कोणती कारणे आहेत ?

(अ) नैसर्गिक आपत्तीवर नियंत्रण

(ब) जन्म दरात बाढ तर मृत्यू दरात घट

(क) अल्प वयात विवाह करण्याची प्रथा

(ड) धार्मिक कारणावरून कुटुंब नियोजनास विरोध

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) फक्त (ब), (क) (4) वरील सर्व (अ), (ब), (क), (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**73.** महाराष्ट्रात अनुसूचित जातीतील अल्पभूधारक, त्याचप्रमाणे कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजनेतील लाभार्थींना जमीन कसण्यासाठी 100% अनुदानावर कशाचा पुरवठा होतो ?

(1) पॉवर टिलर (2) ट्रॅक्टर (3) टेम्पो (4) बैलजोडी

---

**74.** करिशमॅटिक अथॉरिटी (charismatic authority) या प्राधिकाराचे विश्लेषण कोणत्या समाजशास्त्रज्ञाने केले ?

(1) कार्ल मार्क्स (2) सी.एच.कुले (3) एमिल डरखाईम (4) मॅक्स वेबर

---

**75.** माजी केंद्रीय सनदी अधिकारी व अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे माजी आयुक्त डॉ. ब्रह्मदेव शर्मा यांनी स्वेच्छा निवृत्तीनंतर __________ या संघटनेमार्फत छत्तीसगडच्या आदिवासींमध्ये काम सुरू ठेवले आहे.

(1) भारत जन आंदोलन (2) आदिवासी जन आंदोलन

(3) छत्तीसगड जन आंदोलन (4) किसान-आदिवासी जन आंदोलन

---

**76.** योग्य जोड्या लावा :

| | I गट | | II गट |
|---|---|---|---|
| (अ) | वसंतराव नाईक | (I) | जायकवाडी प्रकल्प |
| (ब) | शंकरराव चव्हाण | (II) | विनाअनुदानीत शाळा/महाविद्यालये |
| (क) | वसंतदादा पाटील | (III) | कृषी संशोधनास प्रोत्साहन |
| (ड) | शरद पवार | (IV) | ग्रामीण रोजगार हमी योजना |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (IV) | (I) | (II) | (III) |
| (2) | (I) | (IV) | (III) | (II) |
| (3) | (IV) | (II) | (I) | (III) |
| (4) | (IV) | (III) | (II) | (I) |

---

**77.** महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही म्हणून खालीलपैकी कोणाची निवड केली ?

(1) काका कालेलकर (2) कर्मवीर अणे

(3) गोपाळकृष्ण गोखले (4) विनोबा भावे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

78. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी दरम्यान झालेल्या कोणत्या अहवालाचा संयुक्त महाराष्ट्रवादी नेत्यांनी निषेध केला ?

(1) अकोला करार
(2) दार आयोग
(3) जे.व्ही.पी. समिती
(4) नागपूर करार

---

79. ब्रिटीश इंडिया कंपनीला महाराष्ट्रात रस्ते बांधण्याची आवश्यकता वाटली, कारण :

(अ) महाराष्ट्रातील जमिनीचा सर्व्हे करणे, मोजणी करणे आणि महसूल व्यवस्थेत सुधारणा करुन कंपनीचे उत्पन्न वाढविणे.

(ब) महाराष्ट्रात पिकणारा कापूस व साखर अंतर्गत भागातून निर्यातीसाठी समुद्र किनाऱ्यावर आणण्याची कंपनीला गरज.

(क) दुष्काळग्रस्त भागाला लवकर धान्यपुरवठा करणे.

(ड) जनतेच्या सोयीसाठी रस्ते बांधणी करणे.

(1) (अ), (ब) आणि (क)
(2) (अ) आणि (ब) फक्त
(3) (ब) फक्त
(4) (ड) फक्त

---

80. शेतीच्या व्यापारीकरणामुळे महाराष्ट्रावर काय परिणाम झाले ?

(अ) जुन्या धंद्याचा ऱ्हास झाला तरी शेत मालावर आधारित काही नवीन यांत्रिक धंद्याची वाढ झाली.

(ब) महाराष्ट्रातील अंतर्गत व्यापार वाढला.

(क) शेतातील कच्च्या मालाची निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढली.

(ड) व्यापारी व सावकार यांचे महत्व कमी झाले.

(1) (अ) फक्त
(2) (क) फक्त
(3) (अ), (ब) आणि (क)
(4) (अ) आणि (ड)

---

81. तापमान सर्वसामान्यपणे विषुववृत्तीय प्रदेशापेक्षा ध्रुवीय प्रदेशात कमी असते याचे भौगोलिक कारण ________ .

(अ) वाऱ्याची गती ध्रुवीय प्रदेशात जास्त असते.

(ब) थंड हवेमुळे भूपृष्ठाचे तापमान एकदम कमी होते.

(क) ध्रुवीय प्रदेशात उष्णतेचे उत्सर्जन खूप जास्त असते.

(ड) ध्रुवीय प्रदेशात सूर्याची किरणे तिरकस पडतात.

(1) फक्त (ब)
(2) फक्त (ड)
(3) (अ) आणि (ब)
(4) (क) आणि (ड)

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

82. खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

(अ) महाराष्ट्रात घरगुती विजेचा वापर सर्वाधिक आहे.

(ब) महाराष्ट्रात औद्योगिक क्षेत्रात विजेचा वापर सर्वाधिक आहे.

(क) महाराष्ट्रात कृषी क्षेत्रात विजेचा वापर सर्वाधिक आहे.

(ड) महाराष्ट्रात वाणिज्य क्षेत्रात विजेचा वापर सर्वाधिक आहे.

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब) (3) (अ) आणि (ब) (4) (क) आणि (ड)

---

83. खालीलपैकी कोणते विधान बिनचूक आहे ?

(अ) 16° चे उत्तर अक्षवृत्त आंध्र प्रदेशातून जात आहे.

(ब) 20° चे उत्तर अक्षवृत्त मध्य प्रदेशातून जात आहे.

(क) 24° चे उत्तर अक्षवृत्त उत्तर प्रदेशातून जात आहे.

(ड) 28° चे उत्तर अक्षवृत्त हिमाचल प्रदेशातून जात आहे.

(1) फक्त (अ) (2) (अ) आणि (ब) (3) (क) आणि (ड) (4) फक्त (ड)

---

84. खालील विधानांवरून योग्य पर्याय निवडा :

(अ) महाराष्ट्रातील स्त्री-पुरुष प्रमाण (लिंगगुणोत्तर) हे सन 2001-2011 या काळात 922 वरून 925 पर्यंत वाढले.

(ब) सन 2011 नुसार, महाराष्ट्राचे लिंगगुणोत्तर हे देशाच्या लिंगगुणोत्तरापेक्षा 15 (पंधराने) ने कमी आहे.

(1) केवळ (अ) सत्य आहे.

(2) केवळ (ब) सत्य आहे.

(3) दोन्ही विधाने असत्य आहेत.

(4) दोन्ही विधाने सत्य आहेत.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

85. जमिनीची धूप म्हणजे __________ .

(अ) जमिनीचे निकृष्टीकरण

(ब) जमिनीचा कस कमी होणे

(क) जमिनीची उत्पादकता घटणे

(ड) वारा व पाण्यामुळे जमिनीचा थर वाहून जाणे

(1) फक्त (ब) (2) फक्त (अ)

(3) फक्त (ड) (4) (अ), (ब) आणि (क)

---

86. भारतीय राज्यघटनेमध्ये सद्य:स्थितीत किती परिशिष्टे आहेत.

(1) 08 (2) 10 (3) 12 (4) 14

---

87. महाराष्ट्रातील गावे पर्यावरण पूरक आणि नियोजनबध्दरित्या विकसित व्हावीत यासाठी ऑक्टोबर 2010 पासून शासनाने कोणती योजना सुरू केली आहे ?

(1) हरीत ग्राम योजना (2) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता योजना

(3) निर्मल ग्राम योजना (4) पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना

---

88. भारतीय राज्य घटनेनुसार भारताचा आजचा प्रथम नागरिक कोण आहे ?

(1) श्री. प्रणब मुखर्जी (2) डॉ. मनमोहन सिंह

(3) श्रीमती सोनिया गांधी (4) वरीलपैकी कोणीही नाही.

---

89. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या सदस्याचा कार्यकाळ किती वर्षांचा असतो ?

(1) 5 (2) 6 (3) 3 (4) 7

---

90. किमान किती लोकसंख्या असलेल्या शहरासाठी महानगरपालिका स्थापन करता येते ?

(1) दोन लाख (2) चार लाख (3) सहा लाख (4) तीन लाख

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

91. भारतीय राज्यघटना निर्मितीसाठी तयार केलेल्या विविध समित्यांपैकी मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून कोणी काम पाहिले ?

(1) डॉ. राजेंद्र प्रसाद (2) डॉ. के.एम्. मुन्शी

(3) डॉ. बी.आर. आंबेडकर (4) बी. पट्टाभी सितारामय्या

---

92. महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्था केव्हापासून अंमलात आली ?

(1) 1 मे 1960 (2) 26 नोव्हेंबर 1949 (3) 1 मे 1962 (4) 1 मे 1952

---

93. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीच्या संदर्भात (एफ.डी.आय.) संसदेमध्ये कोणत्या नियम क्रमांकानुसार चर्चा झाली ?

(1) 252 (2) 476 (3) 184 (4) 104

---

94. भारतीय राज्यघटनेतील कोणत्या कलमामध्ये देशातील स्त्री–पुरुषांना समान कामासाठी समान वेतन देण्याच्या मार्गदर्शक तत्वाची तरतूद आहे ?

(1) कलम 38 (2) कलम 39 (3) कलम 40 (4) कलम 41

---

95. भारताच्या राष्ट्रपतींना आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार देणारी तरतूद करताना कोणत्या देशाच्या राज्यघटनेकडून प्रेरणा घेतली गेली ?

(1) जर्मनीची वाईमर प्रजासत्ताक राज्यघटना (2) सोव्हिएट रशियाची राज्यघटना

(3) अमेरिकेची राज्यघटना (4) जपानची राज्यघटना

---

96. भाववाढ कमी करण्यासाठी मागणीच्या प्रमाणात पुरवठा वाढविला पाहिजे पण सद्यस्थितीत पुरवठा वाढविण्यात कोणते अडथळे आहेत ?

(अ) भारतातील मान्सूनची अनिश्चितता

(ब) उत्पादनात सुधारित तंत्रज्ञानाचा वाढता वापर

(क) इंधन टंचाई व वाहतूक वाढीत निर्माण होणारे अडथळे

(ड) विविध उद्योगांना जाणवणारी कच्च्या मालाची टंचाई

(1) (अ), (ब), (क)

(2) (क), (ब), (ड)

(3) (अ), (क), (ड)

(4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**97.** DNA चा रेणू हा पुढीलपैकी कोणत्या रसायनांच्या संचाच्या लांबलचक शृंखलांनी बनलेला असतो ?

(1) नत्रयुक्त आम्लारी, साखर, फॉस्फेट, ग्लुकोज

(2) रायबोज शर्करा, फॉस्फेट, नत्रयुक्त आम्लारी

(3) पेंटोज, फॉस्फेट, नत्रयुक्त आम्लारी

(4) नत्रयुक्त आम्लारी, पेंटोज, फॉस्फेरिक ॲसिड, फॉस्फरस.

---

**98.** मनुष्याला रंगाधळेपणाचा भास आहे असे म्हणता येते जर __________ .

(1) त्याला सर्व प्रतिमा कृष्णधवल दिसतात.

(2) तो सर्व रंग सामान्यपणे पाहू शकतो.

(3) तो काही रंग ओळखू शकत नाही.

(4) त्या व्यक्तीच्या दृष्टीपटलावर दंडपेशी नसतात.

---

**99.** खालीलपैकी कोणते डेंग्यू रोगाचे लक्षण नाही ?

(अ) खूप ताप येणे

(ब) श्वास जोरात चालणे

(क) रक्ताच्या उलट्या होणे

(ड) दृष्टी कमी होणे

(1) फक्त (अ) (2) फक्त (ड) (3) (ब) आणि (क) (4) (अ) आणि (क)

---


**100.** मुंबई पोलीस दलाचा 'संवाद तुझा माझा' हा उपक्रम __________ संबंधित आहे.

(1) ज्येष्ठ नागरिक (2) कौटुंबिक विवाद

(3) पोलीस-जनता संबंध (4) घटस्फोटित जोडपी

---

**101.** घनाकृतीच्या पुढील आकृत्यांवरुन 4 च्या विरुद्ध पृष्ठभागावर कोणता अंक असेल ?




(i) (ii) (iii) (iv)


(1) 2 (2) 3 (3) 5 (4) 1

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**102.** खाली दिलेल्या पाच आकृत्यांपैकी चार आकृत्यांमध्ये घटक-I हा घटक-II शी एकाच प्रकारे संबंधित आहे. ज्या आकृतीत घटक-I, घटक-II शी त्याच प्रकारे संबंधित नाही, ती आकृती निवडा.



(1) 2 (2) 3 (3) 4 (4) 5

---

**103.** संतोष दिनेशच्या उत्तरेस 4 मीटर अंतरावर आहे. राजीव आणि दीपू संतोषपासून समान अंतरावर आहेत. दीपू, दिनेशपासून तेवढ्याच अंतरावर आहे, जेवढ्या अंतरावर दिनेश राजीवपासून आहे. जर दीपू, दिनेशच्या पूर्वेस 3 मीटर अंतरावर असेल, तर राजीव, संतोषच्या कोणत्या दिशेला व किती अंतरावर आहे ?

(1) ईशान्य - 5 मीटर (2) वायव्य - 5 मीटर (3) नैऋत्य - 5 मीटर (4) ईशान्य - 7 मीटर

---

**104.** एका सांकेतिक भाषेत KGLFT ला PTOUG असे लिहिले जाते. त्याच सांकेतिक भाषेत MERSA कसे लिहिता येईल ?

(1) VIHZN (2) NVIHA (3) NVIHZ (4) NULHZ

---

**105.** एका दुकानदाराने 1040 रुपये परत करताना शंभराच्या काही नोटा दिल्या. त्या नोटाच्या दुप्पट संख्येइतक्या 50 रु. च्या नोटा दिल्या व तिप्पट संख्येइतक्या 20 रु. च्या नोटा दिल्या तर 20 रु. च्या किती नोटा त्याने दिल्या ?

(1) 21 (2) 18 (3) 12 (4) 24

---

**106.** हेमंत, सुमनचा भाऊ गणेशच्या एकुलत्या एक बहिणीच्या वडिलांचा शालक (साला) आहे. तर सुमनचे हेमंतशी नाते काय ?

(1) भाची (2) मामी (3) आजी (4) आई

---


**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**107 ते 111 साठी निर्देश :**

दिलेल्या आलेखाचे अध्ययन करून पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.




**107.** सर्व विभागांचे मिळून, मुलांची एकूण संख्या आणि मुलींची एकूण संख्या यामध्ये किती फरक आहे ?

(1) 440 (2) 520 (3) 580 (4) 460

**108.** गणित विभागातील मुलांची संख्या, सर्व विभागांच्या मिळून मुलांच्या एकूण संख्येच्या जवळपास किती टक्के आहे ?

(1) 15 (2) 23 (3) 31 (4) 44

**109.** जीवशास्त्र विभागातील मुलींची संख्या सर्व विभाग मिळून मुलींच्या एकूण संख्येच्या जवळपास किती टक्के आहे ?

(1) 32 (2) 21 (3) 27 (4) 37

**110.** सर्व विभागांची मिळून मुलांची सरासरी संख्या किती ?

(1) 122 (2) 126 (3) 130 (4) 134

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

111. तत्त्वज्ञान विभागाच्या मुलींच्या संख्येचे मानसशास्त्र विभागाच्या मुलींच्या संख्येशी क्रमश: काय प्रमाण आहे ?

(1) 1 : 2 (2) 7 : 12 (3) 5 : 12 (4) 3 : 4

---

112. जर SINGER = 72, LATA = 34 तर ASHA साठी कोणती संख्या येईल ?

(1) 27 (2) 43 (3) 16 (4) 29

---

113. रात्री 12 वाजल्यापासून सकाळी 6 वाजेपर्यंत मिनिट काटा व तास काटा यांच्यात किती वेळा काटकोन होईल ?

(1) 10 (2) 12 (3) 6 (4) 11

---

114. दिलेल्या अक्षर मालिकेत रिकाम्या जागी कोणती अक्षरे क्रमाने भरल्यास मालिका पूर्ण होईल ?

_cd_bcda_cdab_da

(1) bada (2) babb (3) bbac (4) babc

---

115. जर वजाबाकीच्या ऐवजी भागाकार, गुणाकारा ऐवजी बेरीज, बेरजेच्या चिन्हा ऐवजी गुणाकार, भागाकाराच्या चिन्हाऐवजी वजाबाकी ही चिन्हे वापरली तर $20-4+3\times7\div2$ चे मूल्य किती ?

(1) 42 (2) 35 (3) 15 (4) 20

---

116. खाली दिलेल्या संख्या, एका ठराविक गणिती क्रियेचा वापर करून मांडलेल्या आहेत. प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?

4 * 9 = 97

3 * 7 = 58

9 * 2 = ?

(1) 68 (2) 85 (3) 45 (4) 65

---

117. खालील मालिकेत क्रमाने येणारे पुढील पद कोणते ?

1, 2, 3, 6, 9, 18, 27, 54, __?__.

(1) 56 (2) 108 (3) 81 (4) 27

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

Teachingninja.in

**118.** एका सांकेतिक भाषेत 'pik da pa' चा अर्थ आहे, 'where are you', 'da na ja' चा अर्थ आहे, 'you may come' आणि 'na ka sa' चा अर्थ आहे, 'he may go'. तर या सांकेतिक भाषेत 'come' चा संकेत खालील पैकी कोणता ?

(1) da (2) ja (3) na (4) pa

---

**119.** A, B, C, D आणि E यांना वार्षिक परीक्षेत वेगवेगळे गुण मिळालेले आहेत. यापैकी D ने केवळ E पेक्षा कमी गुण प्राप्त केलेले आहेत. B ने A आणि C पेक्षा अधिक परंतु D पेक्षा कमी गुण प्राप्त केलेले आहेत. तर यापैकी कोणाला सर्वात कमी गुण मिळालेले आहेत ?

(1) A (2) B (3) C (4) माहिती अपूर्ण आहे

---

**120.** आकाश हा धरती पेक्षा सात वर्षांनी लहान आहे. त्या दोघांच्या वयाची बेरीज 43 असल्यास आकाशचे वय किती ?

(1) 18 (2) 25 (3) 33 (4) 24

---

**121.** तीन संख्यामधील, दुसरी संख्या पहिल्या संख्येच्या दुप्पट आणि तिसऱ्या संख्येच्या तिप्पट आहे. जर त्या तीन संख्याची सरासरी 66 असल्यास त्या संख्यामधील मोठी संख्या शोधा :

(1) 66 (2) 132 (3) 102 (4) 108

---

**122.** खाली दिलेल्या पाच संख्यांपैकी चार संख्या विशिष्ट गुणधर्मानुसार एक गट तयार करतात. त्या गटात न बसणारी संख्या शोधा :

(अ) 31 (ब) 39 (क) 47 (ड) 41 (इ) 43

(1) 39 (2) 41 (3) 31 (4) 43

---

**सूचना :** खालील माहितीच्या आधारे **123** ते **127** प्रश्नांची योग्य उत्तरे पर्यायातून निवडा.

A, B, C, D व E हे पाच खेळाडू व खेळत असणारे विविध खेळ यांची माहिती दिली आहे. हॉकी, क्रिकेट, कबड्डी व खो-खो असे हे चार खेळ असून A हा खेळाडू हॉकी वगळता इतर तीन खेळ खेळतो. B व E हे खेळाडू कबड्डी वगळून इतर तीन खेळ खेळतात. C व D कबड्डी खेळतात. C एकूण दोन खेळ खेळतो मात्र तो क्रिकेट व खो-खो खेळत नाही. D देखील दोन खेळ खेळतो मात्र खो-खो खेळत नाही. C व D चे खेळ सारखे नाहीत.

---

**123.** कोणता खेळाडू सर्व चार खेळ खेळतो ?

(1) A (2) B (3) C (4) कोणी नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**124.** D चे खेळ कोणते ?

(1) कबड्डी, खो-खो (2) खो-खो, क्रिकेट (3) कबड्डी, क्रिकेट (4) सर्व खेळ

**125.** खालीलपैकी कोण क्रिकेट खेळतो ?

(1) A, B, D, E (2) B, C, D, E (3) A, B, C, E (4) B, D, A, C

**126.** B, C, E हे तिघेही सामाईक कोणता खेळ खेळतात ?

(1) खो-खो (2) हॉकी (3) क्रिकेट (4) कबड्डी

**127.** A आणि B दोघेही कोणते समान खेळ खेळतात ?

(1) कबड्डी, हॉकी (2) क्रिकेट, कबड्डी (3) हॉकी, खो-खो (4) क्रिकेट, खो-खो

**128.** जर :

(अ) बंगाली व तामिळी लोक राजकारणी, कवी व योध्दे आहेत.

(ब) तामिळी व पंजाबी लोक राजकारणी, योध्दे व गणित तज्ञ आहेत.

(क) पंजाबी व गुजराती लोक राजकारणी, उद्योगपती व गणित तज्ञ आहेत.

(ड) गुजराती व काश्मिरी लोक उद्योगपती, कवी व गणित तज्ञ आहेत.

(इ) बंगाली व काश्मिरी लोक उद्योगपती, कवी व योध्दे आहेत.

असे मानल्यास वरील माहितीद्वारे राजकारणी, उद्योगपती, कवी व गणित तज्ञ असणारे लोक कोणते ?

(1) बंगाली (2) तामिळी (3) पंजाबी (4) गुजराती

**129.** प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.

BDFH : JLNP : : **?** : VXZB

(1) DFHJ (2) MOQS (3) NPRT (4) LNPR

**130.** जान्हवी तिच्या आईपेक्षा 27 वर्षांनी लहान आहे, त्या दोघींच्या वयांची बेरीज 49 वर्षे असल्यास जान्हवीच्या आईचे वय किती ?

(1) 40 वर्षे (2) 36 वर्षे (3) 34 वर्षे (4) 38 वर्षे

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK




Teachingninja.in

**131.** जर BASIC = 34, PAY = 42 तर SALARY = ?

(1) 66 (2) 75 (3) 78 (4) 76

---

**132.** खालील आकृतीतील त्रिकोणांची संख्या किती ?



(1) 26 (2) 24 (3) 20 (4) 22

---


**133.** खालील विजोड पद ओळखा.

(a) OMKI (b) YWUS (c) RTPN (d) JHFD

(1) OMKI (2) YWUS (3) RTPN (4) JHFD

---

**134.** आकृतीमधील मूळाक्षरांच्या संकेतानुसार प्रश्नचिन्हाच्या जागी कोणते मूळाक्षर असेल ?




(1) O (2) V (3) W (4) X

---

**135.** a_ba_cbaac_aa_ba या अक्षर मालेतील रिकाम्या जागी, मालिका पूर्ण होण्यासाठी योग्य अक्षरे भरल्यास, कोणता अक्षर गट रिकाम्या जागी असेल ?

(1) cabc (2) abac (3) acba (4) aabc

---

**136.** जर $15 \times 71 = 48$, $92 \times 23 = 55$, $37 \times 44 = 80$ तर $54 \times 32 = ?$

(1) 60 (2) 40 (3) 50 (4) 45

---

**137.** खालील प्रश्नचिन्हाच्या जागी काय येईल ?

BDG, CEH, DFI, EGJ, __?__.

(1) EIK (2) FHK (3) GIL (4) FGL

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**138.** खालील प्रश्नामध्ये दोन विधाने व चार अनुमान दिले आहेत. दिलेल्या विधानावरून कोणते अनुमान बरोबर आहे हे ठरवा व निवडा.

**विधान :** काही बैल वर्तुळ आहेत, सर्व वर्तुळ सिंह आहेत.

**अनुमान :**

(अ) सर्व सिंह वर्तुळ आहेत.

(ब) सर्व बैल वर्तुळ आहेत.

(क) काही बैल जे वर्तुळ नाहीत असे सिंह आहेत.

(ड) काही सिंह बैल आहेत.

(1) सर्व अनुमान बरोबर आहेत.

(2) फक्त (अ) व (ब) बरोबर आहेत.

(3) फक्त (क) व (ड) बरोबर आहेत.

(4) फक्त (ड) अनुमान बरोबर आहे.

---

**139.** खालील संख्या मालेतील चुकीचे पद ओळखा ?

75, 72, 67, 60, 49, 40, 27

(1) 49 (2) 60 (3) 40 (4) 67

---

**140.** संतोष सुरेशपेक्षा उंच पण सतीशपेक्षा ठेंगू आहे. रमेश शरदपेक्षा उंच पण गोपालपेक्षा ठेंगू आहे. दिनेश सुरेशपेक्षा ठेंगू पण गोपालपेक्षा उंच आहे. या सात मुलांमध्ये सर्वात उंच कोण ?

(1) शरद (2) सुरेश (3) सतीश (4) गोपाल

---

**141.** खालीलपैकी गटात न बसणारे पद कोणते आहे ?

52, 91, 46, 65

(1) 52 (2) 91 (3) 46 (4) 65

---

**142.** जर RAGHAV = 18, SATCHIDANAND = 36 तर VEERBHADRA = ?

(1) 27 (2) 24 (3) 29 (4) 30

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**143.** जर '×' म्हणजे बेरीज, '÷' म्हणजे वजाबाकी, '+' म्हणजे गुणकार व '–' म्हणजे भागाकार मानला, तर $40 \times 8 \div 8 - 4 + 2 = ?$

(1) 20 (2) 52 (3) 92 (4) 44

---

**144.** एका सांकेतिक भाषेमध्ये POLISH हा शब्द LKHEOD लिहिला जातो तर HEN हा शब्द या सांकेतिक भाषेत कसा लिहिला जाईल ?

(1) DAJ (2) DBK (3) DBI (4) DAD

---

**145.** एका मंचावर सहा वक्ते भाषण देण्यासाठी पुढील प्रमाणे बसले आहेत. उमेश आणि समीर यांच्यामध्ये फक्त प्रकाश आहे, तिमिर एका कडेला आहे. कुरेशी आणि समीर यांच्यामध्ये कोणीही नाही, राकेश हा कडेला नाही मात्र उमेशच्या डाव्या बाजूला लगेच आहे यावरून तिमिर आणि उमेशच्या मध्ये कोण बसले आहे ?

(1) प्रकाश (2) समीर (3) कुरेशी (4) राकेश

---

**146.** प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?

2, 10, 30, 68, 130, 222, __?__.

(1) 326 (2) 333 (3) 343 (4) 350

---

**147.** एक लंबकाचे घड्याळ अर्ध्या तासाला एक टोल व तासाला वेळेइतके (उदा. 2 वाजता 2, 3 वाजता 3 इत्यादि) टोल देत असेल तर 4 वाजून 20 मिनिटे ते 7 वाजून 40 मिनिटे या कालावधीत ते एकूण किती टोल देईल ?

(1) 19 (2) 20 (3) 21 (4) 22

---

**148.** प्रवीणचे घड्याळ प्रत्येक तासाला 4 सेंकद पुढे जाते. सोमवारी सकाळी 11.00 वाजता बरोबर लावलेले घड्याळ त्यानंतर येणाऱ्या शनिवारी सकाळी 11.00 वाजता कोणती वेळ दाखवेल ?

(1) 11 वाजून 8 मिनिटे (2) 11 वाजून 2 मिनिटे

(3) 11 वाजून 30 मिनिटे (4) 11 वाजून 48 मिनिटे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**149.** A, B, C, D, E या पाच नद्यांपैकी A नदी ही B नदी पेक्षा आखूड पण E नदी पेक्षा अधिक लांबीची आहे. C नदी सर्वाधिक लांबीची आहे. D नदी B नदी पेक्षा थोडीशी आखूड व A नदी पेक्षा थोडीशी अधिक लांबीची असेल तर सर्वात आखूड नदी कोणती ?

(1) A (2) B (3) D (4) E

---

**150.** समस्या विधानासाठीच्या उपायांची योग्यता पडताळून योग्य पर्याय निवडा.

**विधान :** शहरी लोकांना पिण्याचे पाणी अपूरे पडते.

**उपाय :**

(अ) शहरातील लोकांनी कमी पाणी प्यावे.

(ब) शहरी लोकांनी बाटलीमधील पाणी प्यावे.

(क) पाणी वाटपात योग्य नियोजन हवे.

(ड) पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी शहरी लोकांचे उद्‌बोधन व्हावे.

(1) सर्व उपाय बरोबर आहेत.

(2) फक्त उपाय (ब) बरोबर

(3) फक्त उपाय (क) आणि (ड) बरोबर

(4) सर्व उपाय चूक आहेत.

---

-o0o-

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भीती वाटणे (4) बहरून येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भीती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

SEAL

Teachingninja.in